रयत शिक्षण संस्थेचे,

# सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर

## शिष्यवृत्ती नोटीस - २०२४-२५

## बी.कॉम. व एम.कॉममधील विद्यार्थ्यांसाठी

## अंतीम दिनांक ३०/११/२०२४

०१/०८/२०२४

## एससी / ओबीसी/ एसबीसी / व्हीजेएनटी / एसटी शिष्यवृत्ती व फ्रि-शिप अर्ज

सन २०२४-२५ मध्ये प्रवेश घेतलेल्या सिनिअर महाविद्यालयातील बी.कॉम. व एम.कॉम. वर्गातील **एस.सी./ओबीसी./एसबीसी./एन.टी./एस.टी.**कॅटेगिरीतील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की शिष्यवृत्ती व फ्रि-शिप अर्ज **mahadbtmahait.gov.in** या वेबसाईटवर ऑनलाईन भरुन महाविद्यालयात शिष्यवृत्ती विभागात दि.३०/११/२०२४ अखेर सकाळी ११:०० ते दुपारी १:३० वाजेपर्यंत या दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणेच जमा करावेत. **जे विद्यार्थी शिष्यवृत्ती अर्ज भरणार नाही अशा विद्यार्थ्यांना पेईंग फी प्रमाणे फी भरावी लागेल त्यामुळे विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या आर्थिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही याची संबंधीत विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

**सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती किंवा अल्पसंख्यांक शिष्यवृत्तीचा किंवा विद्यापीठ शिष्यवृत्ती अर्ज भरुन देणाऱ्या विद्यार्थ्यांना** एस.सी./ओ.बी.सी./एस.बी.सी./एन.टी./एस.टी./अपंग/राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क योजना या शिष्यवृत्तीचा **अर्ज भरता येणार नाही याची संबंधीत विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

**ऑनलाईन फॉर्म भरताना फक्त ओरीजनलच कागदपत्र अपलोड करावे. झेरॉक्स अपलोड करु नये.** झेरॉक्स अपलोड केले तर अशा विद्यार्थ्यांचे अर्ज दुरुस्तीसाठी विद्यार्थी लॉगीनला परत पाठविले जातील याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. तसेच ऑनलाईन अर्ज भरताना **SSC, XI** सह सर्व वर्गांची माहिती भरणे.

**ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्जाला खालील प्रमाणे कागदपत्रे अटेस्टेड किंवा सेल्फ अटेस्टेड करुन जोडून द्यावीत. अर्ज भरताना फी पेड कॉलममध्ये फी झिरो (शुन्य ) टाकावी.**

| | |
|---|---|
| १ | डोमासाईल सर्टिफिकेट झेरॉक्स |
| २ | रेशन कार्ड झेरॉक्स **(ज्या विद्यार्थ्याकडे रेशनकार्ड नाही किंवा रेशनकार्ड मध्ये नाव नाही अशा विद्यार्थ्यांनीदेखील शिष्यवृत्ती अर्ज भरुन महाविद्यालयात जमा करावा.)** |
| ३ | अल्प कुटुंबाबतचे प्रमाणपत्र / हमीपत्र हाताने भरुन जमा करणे |
| ४ | शाळा सोडल्याचा दाखला, इतर महाविद्यालयातून आलेले असल्यास टीसीची झेरॉक्स. ओरीजनल दाखल्याची पीडीएफ फाईल विद्यार्थ्याजवळ उपलब्ध नसल्यास **दाखल्याची झेरॉक्स महाविद्यालयातून अटेस्टेड करुन मगच अपलोड करावी.** |
| ५ | आधारकार्ड झेरॉक्स. **६.** आधार कार्ड बँक खात्याशी लिंक असलेला फॉर्म बँकेच्या सही शिक्क्यासह झेरॉक्स. |
| ७ | जातीचा दाखला झेरॉक्स. **८.** सन २०२४-२५ ची प्रवेश पावती झेरॉक्स. |
| ९ | **सन २०२३-२४ चा वडीलांचा ओरिजनल उत्पन्नाचा तहसिलदार यांचेकडील दाखला जोडावा.** (वडील मयत असल्यास आईचा उत्पन्नाचा दाखला जोडून वडीलांच्या मृत्यु दाखल्याची झेरॉक्स जोडावी. आई-वडील विभक्त राहत असल्यास त्या संबंधीचे कागदपत्र किंवा कागदपत्र नसल्यास त्यासंबंधी साध्या कागदावर (**Affidavit**) करणे. ) |
| १० | **ओ.बी.सी./ एस.बी.सी./ एन.टी./ मधील ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न १.५० लाख रुपये ते ८ लाख रुपयांपर्यंत असेल अशा विद्यार्थ्यांना आपल्या फ्रि-शिप अर्जाबरोबर नॉन-क्रिमिलियरचा दाखला जोडणे अनिवार्य आहे.** झेरॉक्स. |
| ११ | दहावी व त्यापुढील सर्व गुणपत्रक ( फेल व एटीकेटीसह सर्व गुणपत्रक जोडणे ) तसेच मागील वर्षाचा निकाल ऑनलाईन असल्यास **सदर निकाल कॉलेजमधून अटेस्टेड करुन मगच अपलोड करावा.** गॅप असल्यास गॅप सर्टिफीकेट साध्या कागदावर (**Affidavit**) करणे. |
| १२ | विद्यार्थी शासकीय वसतिगृहात राहत असल्यास शिष्यवृत्ती अर्जात वसतिगृहाची सर्व माहिती भरणे अनिवार्य आहे. तसेच शासकीय वसतिगृहाचे पत्र शिष्यवृत्ती अर्जाला ऑनलाईन अपलोड करुन अर्जास जोडून द्यावे. तसेच महाविद्यालयाच्या वसतिगृहात राहत असल्यास वसतिगृहाची माहिती भरुन वसतिगृहाची प्रवेश पावती शिष्यवृत्ती अर्जाला जोडून द्यावी. |
| १३ | बँक पासबुक झेरॉक्स. |

सदर सूचना महाविद्यालयाच्या वेबसाईटवर देखील टाकण्यात आलेली आहे.

**www.cdjcollege.com**

प्र. प्राचार्य,
सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,
श्रीरामपूर